# प्रकरण पाचवे

## निष्कर्ष व शिफारशी

भारतीय राज्यघटनेत ७३ वी घटनादुरुस्ती होण्यापूर्वी १९९० मध्ये महाराष्ट्रात श्री शरद पवारांच्या सरकारने स्त्रियांसाठी ३०% जागा स्थानिक स्वराज्य संस्थात राखीव ठेरवण्याचे धोरण अंमलात आले व या धोरणांतर्गत आरक्षण लागू झालेली कोल्हापूर महानगरपालिकेची पहिली निवडणूक १९९० ला पार पडली. सध्या कार्यरत असलेले सदस्य हे ऑक्टो. २००५ च्या निवडणूकीत निवडून आलेले आहेत. स्त्रियांसाठी राखीव जागा अंमलात आल्यानंतरची ही ४ थी निवडणूक होती.

कोल्हापूर महानगरपालिकेतील स्त्री-पुरुष सदस्यांचा तुलनात्मक अभ्यास करताना, महिलांच्या राखीव जागा धोरणांच्या अंमलबजावणीचा स्त्री व पुरुष नगरसेवकांवर झालेला परिणामांच तसेच नगरसेवक व नगरसेविकांच्या प्रगट व अप्रगट अशा अनेक पैलुंचा शोध घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे. हा अभ्यास करताना स्त्री-पुरुष नगरसेवकांमध्ये तुलना करताना त्यांच्यामधील भेदस्थळांबरोबर त्यांच्यातील साम्यस्थळे शोधून त्यांचाही अभ्यास करण्यात आला. ज्या-ज्या गोष्टींमुळे स्त्री व पुरुष नगरसेवकांमध्ये तुलना करणे शक्य झाले अशा सर्व गोष्टींचा मागोवा घेण्याचा प्रयत्न या प्रबंधामध्ये करण्यात आला आहे. स्त्री व पुरुष नगरसेवकांमधील भेद व साम्यस्थळे शोधून त्यातून निघणारे निष्कर्ष पुढीलप्रमाणे,

१. सर्वसाधारणपणे ४० ते ४५ वर्षानंतर स्त्री व पुरुष नगरसेवक सांसारिक जबाबदा-यातून थोड्याफार प्रमाणात मुक्त होतात व त्यामुळे साहजिकच त्यांचा सामाजिक व राजकीय सहभाग वाढतो असे विविध अभ्यासातून पुढे आले आहे. पण हा अभ्यास करताना मात्र ३६ ते ४५ म्हणजेच सर्वसाधारणपणे तरुण किंवा ज्य वयामध्ये कौटुंबिक जबबदा-या थोड्या अधिक प्रमाणात व्यक्तींवर येतात त्याच वयात स्त्री-पुरुष नगरसेवकांचा समावेश या महानगरपालिकेमध्ये पहायला मिळतो. याचाच अर्थ आरक्षणाच्या धोरणामुळे प्रतिनिधित्वाच्या पदांमध्ये भरती होण्याचे स्त्रियांचे सरासरी वय घटले आहे असा निष्कर्ष काढण्यास वाव आहे.

२. २५ ते ३५ या वयोगटामध्ये नगरपालिकेमध्ये प्रविष्ट होणा-यांमध्ये पुरुषांच्या (२८.५७%) तुलनेत स्त्रियांची संख्या (७१.४३%) जास्त आढळते. म्हणजेच पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना

महानगरपालिकेतील सदस्यत्वाची संधी तुलनेने लहान वयात असूनही अधिक मोठ्या प्रमाणात मिळाल्याचे आढळते.

३. राखीव जागा धोरणामुळे पुरेशा अनुभवाखेरीजही प्रतिनिधित्वाची भूमिका बजावण्याची संधी स्त्रियांच्या वाट्याला आलेली आहे. मात्र ही जबाबदारी पेलण्यासाठी लागणा-या अनुभवांची त्यांच्याकडे असलेली उणीव भरुन काढण्यासाठी त्यांना विशेष प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

४. खुल्या वर्गातील स्त्री-पुरुषांबरोबरच इतर मागासवर्गीय स्त्री-पुरुषांचे समान प्रतिनिधित्व सध्या कार्यरत असलेल्या नगरसेवकात दिसून येते. राखीव जागांच्या धोरणांमुळे अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय आणि महिला अशा घटकांना व्यापक प्रतिनिधित्व मिळाल्यामुळे सत्तेत सहभागी होऊ शकणा-या विविध घटकांमुळे भारतीय लोकशाहीचा पाया अधिक व्यापक बनला आहे.

५. एकूण मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांपैकी सर्वाधिक संख्या शिक्षित (१२ वी व पदवी) नगरसेवक व नगरसेविकांचीही असलेली आढ़ळले यावरुनही शिक्षण हा आजही राजकीय सहभागातील महत्वाचा घटक असल्याचे दिसून येते.

६. सर्वसाधारणपणे पुरुष सदस्यांना राजकारणाचा अनुभव भरपूर असतो. समाजात वावरण्यामुळे किंवा इतर कुठल्याही राजकीय संस्थेत काम केल्याचा किंवा निवडणूकीला उभे राहण्याचा पूर्वानुभव पुरुषांना असतो पण इथ मात्र नवनिर्वाचित स्त्रियांबरोबरच पुरुषांची संख्याही ब-यापैकी (३८.२४%) इतकी असल्याची दिसते. आरक्षण धोरणामुळे अचानक निवडून आलेल्या महिलांना निवडणुकीपूर्वीचा राजकीय अनुभव नसेल असे गृहित धरले तरी जवळजवळ तेवढ्याच (३८.२४%) पुरुषांनाही निवडणूकीपूर्वी काहीच राजकीय अनुभव नसावा हे आश्चर्य करण्याजोगे आहे. यामध्ये पुरेसा अनुभव नसतानाही प्रतिनिधित्वाची संधी मिळणे आरक्षण धोरणामुळे स्त्रियांना सोपे झाले हे स्पष्ट होते.

७. विकास कामांसाठी मिळणारे निधी अपुरे आहेत, त्यामध्ये विकासकामे होऊच शकत नाहीत, त्यामुळे नगरसेवकांना अजून जास्त फंड मिळाला पाहिजे असे म्हणणा-यांमध्ये एकूण ३४ पुरुषांपैकी ३३ (९७.०५%) पुरुषांनी म्हटले आहे. तर एकूण नगरसेविकांपैकी २४ (८८.००%) नगरसेविकांचा समावेश होतो.

८. फक्त महिला बालकल्याण समितीतर्फेच महिलांसाठीची कामे करता येतात असा एकूण मुलाखत घेतलेल्या ६१ नगरसेवकांपैकी ३३ नगरसेवकांचा समज झालेला दिसतो.

९. बहुतेक नगरसेविकांना (८१.८५%) निवडणुकीचा प्रचार करतानाही पतींच्या सहकार्याची गरज लागली तर (९४.१२%) नगरसेवकांनी स्वतःची प्रचार मोहिम स्वतःच सांभाळली आहे यावरुन आजही स्त्री राजकाणामध्ये वावरताना पतींवर अवलंबून असल्याचे दिसते. हे परावलंबन कमी करण्याठी विशेष प्रशिक्षण आवश्यक आहे.

१०. नगरसेवक म्हणून निवडून आल्यावर सामाजिक दर्जात फरक पडला नाही असे सांगणा-या पुरुषांचे प्रमाण कमी (२०.५९%) असण्याचे कारण निवडणूकीपूर्वीही हे सर्व सामाजिकदृष्ट्या सक्रिय होते. तर बहुतेक स्त्रियांना निवडून आल्यामुळेच नगरसेविकेची संधी मिळाली हे आहे.

११. राजकारणात टिकून राहण्यासाठी सर्वसामान्य पुरूषांपेक्षा सर्वसामान्य स्त्रीला परिस्थिती प्रतिकूल असते याची या दोघांनाही जाणीव असल्याचे जाणवते

१२. एकूण मुलाखत घेतलेल्या ३४ नगरसेवकांपैकी १७ (५०%) नगरसेवकांनी राजकीय प्रवेश अपघातानेच झाला असल्याचे म्हटले आहे. साधारणतः स्त्रियांचा राजकीय प्रवेश, प्रभाग महिला आरक्षित झाल्यांमुळे अपघाताने किंवा अचानक होऊ शकतो. पण ५०% इतक्या प्रचंड संख्यने नगरसेवक अपघाताने राजकारणात आले हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. यावरुन स्त्रियांप्रमाणेच अनेक पुरुषांनाही फारशा अनुभवाची गरज नसते असे लक्षात येते.

१३. राजकारणात अनेक लोकांशी भेटताना काही अडचणी जाणवतात का ? या प्रश्नावर बहुतेक नगरसेविकांनी, पुरुष नगरसेवकांप्रमाणेच कसल्याही प्रकारच्या अडचणी जाणवत नाहीत असे सांगितले. याबद्दल स्त्रियांना अधिक खुलासा करण्यास सांगितले असता, पतींच्या राजकीय ओळखीचा, अनुभवाचा फायदा या नगरसेविकांना होतो हे सिध्द झाले. याचाच अर्थ निदान स्थानिक स्तरावर तरी महिला लोकप्रतिनिधी राजकीय प्रक्रियेत सक्रिय असण्यासाठी अजूनही पुरुष माध्यमाचा उपयोग करतात हे सिध्द होते. सुरुवातीला पुरुष नातलगाची मध्यस्थी आवश्यक वाटली तरी ५ वर्षांच्या कार्यकालात हळूहळू स्वतंत्र होणे अशयक्य नाही. मात्र त्यासाठीची प्रेरणा सर्वसामान्य नगरसेविकेत पुरेशी प्रखर असल्याचे अढळत नाही.

१४. सर्वसाधारणपणे बहुसंख्य स्त्री व पुरुष नगरसेवकांनी स्त्रियांसाठी आपापल्या मतदार संघात कामे केली आहेत, पण त्यांची ही कामे महिला व बालकल्याण समिती, महिला मंडळे व बचत गटामार्फतच केली आहेत. त्याशिवायही महिलांसाठी करता येण्याजोगी पुष्कळ कामे आहेत हे बहुतेकांना माहितही नसल्याचे जाणवले.

१५. स्वतःच्या इच्छेने निवडणूक लढविणा-यांमध्ये पुरुष सहका-यांबरोबरच स्त्रियांचाही समावेश होतो. घरचा वारसा पुढे चालविण्यासाठी राखीव मतदारसंघातून निवडून आलेल्या स्त्रियाही स्वतःच्या इच्छेने निवडणूक लढविला असे शंकास्पद उत्तरे देताना आढळल्या, कारण त्यांना पुढे प्रभाग खुला झाल्यावरही तुम्ही निवडणूक लढविणार का ? असे विचारता बहुतेक सर्व नगरसेविकांनी 'नाही' उत्तर दिले. म्हणजेच जर या स्त्रियांना आरक्षित मतदार संघ मिळाला नसता तर स्त्रियांना राजकारणात प्रवेश करणे अवघड गेले असते.

१६. पुरुष नगरसेवकांना 'एक पुरुष' म्हणून बरेच फायदे मिळतात तर स्त्रियांना त्या 'स्त्री' असण्यामुळे काही मर्यादा पडतात या मुद्यावर दोन्ही बाजुने एकमत झाल्याचे आढळले. याबाबत पुरुष नगरसेवकांनी पारंपारिक दृष्टीकोनच पुढे चालविला असे म्हणता येऊ शकते पण स्त्रियांनीही याला दुजोरा देणे, हे त्यांच्यातील कमी आत्मविश्वासाचे द्योतक आहे.

१७. महानगरपालिकेतील महत्वाच्या समित्यांमध्ये म्हणजेच स्थायी समिती, परिवहन समिती, प्राथमिक शिक्षण मंडळ या समित्यांमध्ये महिला सदस्यांना ब-यापैकी संधी मिळाल्याचे दिसते. आजपर्यंत कोल्हापूर महानगरपालिकेच्या इतिहासात एकाही नगरसेविकेला स्थायी समितीचे सभापती पद मिळालेले नाही. या पार्श्वभूमीवर ७ नगरसेविकांनी स्थायी समितीचे सभापती पद मिळेल व २ नगरसेविकांनी विधानसभा सदस्यत्व मिळेल असा आशावाद व्यक्त करणे म्हणजे नव्याने निर्माण झालेला त्यांचा आत्मविश्वास आहे की त्यांना वास्तवाचे पुरेसे भान नाही असा प्रश्न निर्माण होतो.

१८) महिला व बालकल्याण समितीमध्ये सलग तीन वर्ष एकही पुरुष सदस्य नाही हे प्रकर्षाने दिसून आले. कदाचित स्त्रियांबाबतचे प्रश्न स्त्रियाच जास्त चांगल्या प्रकारे सोडवू शकतील म्हणून पुरुषांनी सदस्यत्व घेतले नसेल किंवा एका महिलेच्या अध्यक्षत्वाखाली कामे करणे कमीपणाचे मानूनही कुणी या समितीमध्ये सदस्यत्व घेतले नसेल.

१९) सध्या कॉर्पोरेटर म्हणून निवडून आल्यामुळे बहुसंख्य नगरसेवक व नगरसेविकांनी, आपल्या अजून जास्त संधी मिळतील असे सांगितले. महापौर श्रीमती सई खराडे यांनी तर

'मी पुढच्या विधानसभा निवडणूकीत, पक्षाचे तिकीट मिळाले, नाही मिळाले तरी उभी राहणार' असल्याचे सांगितले. यावरुन आरक्षणामुळे मिळालेल्या महापौरपदाचा अनुभव पाठीशी असल्याने विधानसभा निवडणूक लढविण्याचा आत्मविश्वास यांच्यामध्ये आला हेही महत्वाचे आहे.

नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर २६ (९६.३०%) इतक्या स्त्रियांबरोबरच २६ (७६.४७%) इतक्या पुरुषांच्या सामाजिक दर्जात फरक पडला असल्याचे दिसते. याबाबत असे म्हणता येईल की, एखादे सार्वजनिक पद भूषविल्यामुळे स्त्रियांच्या सामाजिक दर्जात फरक पडणे साहजिकच असले तरी थोड्या फरकाने तितक्याच पुरुषांच्या सामाजिक दर्जात फरक पडतो ही गोष्ट लक्षणीय आहे.

२०) सध्याच्या कोल्हापूर महानगरपालिकेतील नगरसेविकांचे प्रमाण पाहता कार्यकर्त्या नगरसेविकांपेरक्षा कागदी म्हणजेच घरच्या पुरुषांचा मतदारसंघ अबाधित राखण्यासाठी बहुतेक नगरसेविका निवडणूकीला उभ्या राहतात. घरातील सत्ता घराबाहेर जाऊ नये म्हणून बहुतेकदा घरातील स्त्रियांनाच निवडणुकीला उभ केल जात. मुदत संपल्यावर त्या स्त्रिया आपापल्या पतींकडे आपला मतदारसंघ सुपूर्त करुन राजकीय विजनवासात जातात, असे दिसते कारण अशी नव-याच्या जागेवर निवडून आलेली एकही नगरसेविका परत निवडणुकील उभी राहिल्याचे दिसत नाही. याविषयांवर झालेल्या यापूर्वीच्या अभ्यासांना यामुळे पुष्टी मिळते.

सर्वसाधारणपणे मतदारसंघ राखीव झाला तर अगोदर निवडून आलेल्या उमेदवाराची पत्नी किंवा घरातील तत्सम व्यक्तींनाच जास्त संधी मिळते या मुद्यावर २८ नगरसेवकांचे (८२.३५%) व २१ नगरसेविकांचे (७७.७८%) एकमत झाल्याचे पहायला मिळते. यावरुन या अगोदरच्या अभ्यासकांनी याबाबत काढलेले निष्कर्ष अधिकच बळकट होतात.

२१) राजकारणातील प्रवेशाआधीचा सामाजिक कामाचा अनुभव पाहता जरी १७ (५०%) पुरुषांनी ही निवडणूक पहिल्यांदा लढविली असली तरी त्यापैकी जवळजवळ ६४.७१% पुरुषांना सामाजिक कामाचा अनुभव होता मात्र ८१.४८% स्त्रियांना मात्र निवडणूकीपूर्वी सामाजिक कामाचा अजिबात अनुभव नव्हता. म्हणजेच यापूर्वीच्या अनेक अभ्यासातून स्त्रिया राजकारणात प्रविष्ठ होताना पुरुषांच्या तुलनेत कमी अनुभवांची पार्श्वभूमी घेऊन येतात. या पूर्वी प्रस्थापित झालेल्या निष्कर्षांना सदर अभ्यासतूनही पुष्टी मिळते.

२२) नगरसेवकांना त्यांच्या व्यवसायाबद्दल विचारले असता जवळजवळ ७०.७९% पुरुषांनी ते उद्योग करत असल्याचे सांगितले तर उरलेल्यांनी पूर्णवेळ राजकारण करत असल्याचे सांगितले. जवळजवळ ९६.३०% स्त्रियांनी त्या गृहिणी असल्याचे सांगितले गृहिणी असलेल्या बहुतेक नगरसेविकांचे प्रभाग महिलांसाठी आरक्षित झाल्यामुळेच त्या निवडणूकीला उभ्या राहिल्याचे त्यांच्या मुलाखतीतून निष्पन्न झाले आहे.

२३) निवडणूकीची मोर्चेबांधणी करताना बहुसंख्य पुरूष नगरसेवकांनी स्वत: निवडणूकीची तयारी केल्याचे दिसले, काही नगरसेवकांनी घरची लोक, मित्रपरिवार व कार्यकर्ते यांच्या सहाय्याने तयारी केली मात्र बहुसंख्य स्त्रियांच्या प्रचारांची सुत्रे पुरूषांच्याच हाती असल्याचे आढळून आले.

प्रचाराची [illegible]

**शिफारशी**

१. एकूणच निवडणूक प्रक्रियेतील कागदी नगरसेविकांचे प्रमाण कमी होण्यासाठी मतदारांमध्ये राजकीय प्रबोधनाची गरज आहे तरच मतदार एखादया व्यक्तीची काम करण्याची तळमळ, अनुभव व कुशल नेतृत्वगुण याआधारे निवडणूकीतील आपले मत देतील, ज्या आधारे ख-या कार्यकर्त्यांना न्याय मिळेल.

२. राजकीय क्षेत्रात महिलांना प्रभावी लोकप्रतिनिधी बनविण्यासाठी, प्रशिक्षण देण्याची गरज आहे. ज्यामुळे अशा नगरसेविकांना काम करण्यासाठी योग्य मार्गदर्शन व माहिती मिळू शकेल.

३. नवनिर्वाचित सदस्यांना प्रशिक्षण देण्यासाठी ज्या माजी सदस्यांना राजकारणाचा प्रत्यक्ष अनुभव आहे, त्यांना ठराविक मानधन देवून, त्यांच्या अनुभवाचा फायदा नविन नगरसेवकांना होईल असे अभियान चालविण्याचा उपयोग आहे.

४.लोकप्रतिनिधींना विशेषत: स्त्री-प्रतिनिधींसाठी त्यांच्या जबाबदा-या व्यवस्थित पार पाडण्यासाठी पुरेसे मानधन व प्रशासकीय सहाय्य मिळाले पाहिजे.

५. स्त्रियांचा राजकीय व सामाजिक सहभाग वाढविण्यासाठी त्यांच्यावरिल घरच्या व बाहेरच्याही जबाबदा-या कमी कराव्यात म्हणजे त्यांना राजकारणासाठी व समाजकारणासाठी

वेळ मिळेल.यासाठी विशेषतः स्त्री-लोकप्रतीनिधींच्या पतींचे मार्गदर्शन शिबीरातून प्रबोधन करण्यात यावे.

६. महिला लोकप्रतिनिधीसांठी सर्वमान्य असा किमान कार्यक्रम तयार केला पाहिजे. राखीव जागातून निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींनी समान कार्यक्रमांची बांधीलकी पाळली पाहिजे व हा कार्यक्रम पुढे नेला पाहिजे.

७. कोणत्याही पध्दतीचे राखीव मतदार संघ सोडत पध्दतीने चिठ्ठ्या उचलून न ठरविता, निश्चित चक्री क्रमाणे ठरविले पाहिजे यामुळे राखीव मतदारसंघाबाबतची अनिश्चितता संपून पक्षाला आणि इच्छूक उमेदवारानांही निवडणुकीच्या तयारीसाठी पुरेसा वेळ मिळेल.

८. महिला व बालकल्याण समितीमध्ये किंवा महिलांच्या संबंधित इतर समित्यामंध्ये पुरुषांसाठी एक तृतियांश जागा राखीव ठेवण्यात याव्यात, यामुळे महिलांचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी पुरुषांचीही आहे ही जाणीव पुरुषांमध्ये निर्माण होईल या प्रकारची शिफारस मेघा नानिवडेकरांनी यापूर्वी आपल्या 'महिलांचा सत्तेतील सहभाग' (राखीव जागा धोरणची फलश्रुती) या अहवालात केली आहे.

९. मुख्य शहरांमध्ये जशा प्रकारच्या गरजेच्या सुविधा म्हणजेच रुग्णालये, शिक्षण संस्था, मैदाने असतात तशा उपनगरातील लोकांनाही मिळाव्यात यासाठी योग्य त्या उपाययोजना राबविण्यात याव्यात.

सदर शिफारशींचा उपयोग स्त्री सदस्यांच्या सहभागाची गुणवत्ता व प्रभाव वाढविण्यासाठी अंशतः तरी होऊ शकेल.

# संदर्भसूची


Agnew, V. (1975). "Elite Women in Indian Politics", Delhi, Vikas Publications.

. Archana Kambale -Women leadership in panchayat raj A sociological study- M.Phil Thesis,2000.

Awasthi, Indira. (1982). "Rural women of India", B.R. Publishing Corporation, Delhi.
. Bambawale, U. (1982). "Women and Politics", (Unpublished).

Bochel , J. and Denver , D. (1983). " What Selecters Seek?" , British Journal Of Political Science, Vol. 13.

Carrol, S. J. (1985). " Political elites and sex differene in political ambition", Journal

Chitnis, S. (1980). Introduction, "Women in Third World", Ed. Leeqe Fulehally. Lesley Sawhney, Bombay.

Constantini, E. and Craik, K. (1972)." Women as Politicians", Journal of Social Issues, Vol. 28 .

M. Devendra Babu (2000). " Women Participation in Gram Sabhas (Andhra Pradesh)" Ed.Bidyut Mohanty, Girish Kumar.

Dubeck, P. J. (1976). " Women and access to political office" , Sociological Quarterly, Vol. 17.

Eckstrand, L. E. and Eckert, W.A. (1981). " Impact of candidate's sex on voter's choice", Western political Quarterly, Vol. 34.

Erskine, H. (1971). "The Polls: Women's Roles", Public Opinion Quarterly, Vol. 35.

.Kumari Ranjana(2000). "Participation of Women in Panchayats" Ed.Bidyut Mohanty, Girish Kumar

Limaye, P.N. (1979). "Politicization of women in Maharashtra". In "Symbols of power Ed. Veena Mazumdar. Tawale, S.N. (1979). Profiles of women in Maharashtra" In "Symbols of Power" Ed. Veena Mazumdar.

. Manchanda, Rita. (1988). "Women in Parliament" Manushi, No. 47 July- Aug, 1988.15. Mazumdar, Veena. (1976) "Towards equality", in "Women of the world" Ed. Phadnis, U. and Malani, I.

.Mery Sebastin (2000). "Women and Gram Sabha Experiences from Kerala" Ed.Bidyut Mohanty, Girish Kumar.

Rule, z. (1981). " Why women don't run?", Western Political Quarterly, Vol. 34.

. Samal Avinash(2000). "Report from Bangalore" Ed.Bidyut Mohanty, Girish Kumar.

. Schramm, S. S. (1981). " Women and representation", western Political Quarterly, Vol. 34.

. Sekhar Madhushree (2000). "Women Participation in Gram Sabhas (Tamil Nadu)" Ed.Bidyut Mohanty, Girish Kumar.

Shivaji University Memorandum Submitted to the Parlamentary Committee on Low and Justice 28-06-2008,Mumbai.

Sirsikar, V.M. (1961). "A Study of political workers in Poona" Journal of University of Poona, Vol. 4..

Tawale, S.N. (1979). "Profiles of women in Maharashtra", In, "Symbols of power" Ed. Veena Mazumdar. I.C.S.S.R.

The report of the National Committee on the status of women in India." (1975). I.C.S.S.R., Allied Publishers, Delhi.

The National Perspective Plan for women, 1988-2000 AD.

Vasanti Rasam-,1991-Project Report-Political Participation of Woman Corporaters in Civic Affairs, with special reference of Kolhapur.

Welch, S. and Studler, D.T. (1986). "British Public Opinion Toward Women in Politics", Western Political Quaretrly, Vol.39.

इनामदार एन.आर. १९८९ , "पुण्यातील स्त्रियांची राजकीय जागृती व तिचा सामाजिक जागृतीशी संबंध"-" स्त्री जीवन "....... .

उर्मिला पाटील १९९८ आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय संसदेतील स्त्रियांचे प्रतिनिधित्व -एम. फिल प्रबंध .

कस्तुरी लिला - समकालीन भारतातील नागरी स्त्रिया - संपादन - रेहाना घडियाली - प्रकाशन - डायमंड पब्लिकेशन, २००८.

गवाणकर रोहिणी - मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रुप - प्रकाशक - आदित्य प्रकाशन, १९८६.

तुकाराम पाटील नगरपालिकेच्या कारभारातील नगरसेविकाचा राजकीय अभ्यास विशेष अभ्यास मुरगुड नगरपालिका एम. फिल प्रबंध १९९४

देव विजय, (१९८९) "राजकीय दृष्ट्या पुणे परिसरातील स्त्रीजीवन".

मेधा नानिवडेकरांनी,१९९७-१९९८'महिलांचा सत्तेतील सहभाग' राखीव जागा धोरणाची

नानिवडेकर मेधा - महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा, संपादक
मेधा नानिवडेकर प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००६

नानिवडेकर मेधा - महापालिका निवडणुक प्रक्रिया स्त्रियांच्या
दृष्टिकोनातुन अभ्यास प्रकाशक ,भारतीय स्त्रीशक्ती
१९९७

. हाटे सी (१९८५) "स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री " महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती महामंडळ.

क्षीरे व्ही. के. (१९८९) "पुण्याच्या स्थानिक स्वराज्य शासनात स्त्रियांचा सहभाग स्त्रीजीवन स्थित्यंतर", पुणे परिसर , इतिहास संकलन समिती पुणे (१९८९).

## परिशिष्ट १

## मुलाखत देणाऱ्या महानगरपालिका सदस्यांची यादी

### नगरसेवक

१) श्री. निकम संजय बाबूराव.

२) श्री. देसाई निलेश जयकुमार.

३) श्री. कसबेकर राजेंद्र विलास.

४) श्री. नाईकनवरे प्रकाशराव रामचंद्र.

५) श्री. सावंत महेश आबासो

६) श्री. कांदेकर उमेश मारुती

७) श्री. आवळे अनिल दादु

८) श्री. जाधव संभाजी रमेश

९) श्री. आवळे रविंद्र शिवराम

१०) श्री. जगताप उदय आनंदराव

११) श्री. देवणे संभाजी यशवंत

१२) श्री. मोहिते प्रकाश महादेव

१३) श्री. घोटणे शेखर सदानंद

१४) श्री. माने अमोल गणपतराव

१५) श्री. रेडेकर अशोक बाबुराव

१६) श्री. चौगले प्रकाश श्रीपती

१७) श्री. ढवळे आशिष मनोहर

१८) श्री. चव्हाण सागर प्रल्हाद

१९) श्री. राऊत अजित उर्फ पिंटू विश्वास

२०) श्री. गजगेश्वर नंदकुमार कृष्णा

२१) श्री. वासुदेव महेश यशवंत

२२) श्री. मोरे अजित जयसिंगराव

२३) श्री. सलगर इंद्रजित उर्फ जितु दिनकरराव

२४) श्री. निगवेकर अरुण सुखदेव

२५) श्री. रामाणे मधुकर बापुसो

२६) श्री. इंगवले रविकिरण विष्णुपंत

२७) श्री. पवार संजय बाबुराव

२८) श्री. जाधव अशोक मारुतीराव

२९) श्री. वास्कर विलास भैरु

३०) श्री. गौंडदाब कैलास पांडूरंग

३१) श्री. बसुगडे सदाशिव गजानन

३२) श्री. देशमुख शारगंधर वसंतराव

३३) श्री. मोदी सुनिल जबरचंद

३४) श्री. साळोखे उदय बळवंत

## नगरसेविका

१) श्रीमती पाटील शुभांगी महादेव

२) श्रीमती जरग देविका अजित

३) श्रीमती मिठारी पल्लवी स्नेहल

४) श्रीमती पुरेकर मृदुला रमेश

५) श्रीमती कदम लता प्रकाश

६) श्रीमती महाजन आशा सुनिल

७) श्रीमती खेडकर अनुराधा सचिन

८) श्रीमती माने जयश्री सागर

९) श्रीमती पाटील माणिक जयवंत

१०) श्रीमती भालकर पुष्पा महादेव

११) श्रीमती ठोकळे मंगल बाबासाहेब

१२) श्रीमती लाटवडेकर मनिषा

१३) श्रीमती काटकर संगिता सुनिल

१४) श्रीमती मोरे सरिता नंदकुमार

१५) श्रीमती घोरपडे तेजस्विनी

१६) श्रीमती साळोखे माधुरी शामराव

१७) श्रीमती पंचिद्रे शीला जयराम (बाबु)

१८) श्रीमती पोवार सुषमा प्रदिप

१९) श्रीमती माने स्उिभ्या रकाण्याची एकूण टक्केवारी मता जयसिंगराव

२०) श्रीमती पाटील अलका भिवा

२१) श्रीमती मोमीन रुक्साना मुस्ताक

२२) श्रीमती मुलगी नुतन रविंद्र

२३) श्रीमती भुर्के पद्मजा जगमोहन

२४) श्रीमती पटेकर मेहरुन्नबी बशीर

२५) श्रीमती बुचडे मनिषा लक्ष्मण

२६) श्रीमती हवालदार सुनिता चंद्रकांत

२७) श्रीमती खराडे सई अजित उर्फ इंद्रनिल